अ.शा.पत्र क्र.एमआयएस-११११/प्र.क्र.३७२/राऊशु-३
गृह विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- १३ जानेवारी, २०१२

महाराष्ट्र शासन

रत्नाकर गायकवाड
मुख्य सचिव

प्रिय श्री सुब्रह्मण्यम

आपणास विदित आहे की, मुबई दारुबंदी अधिनियम १९४९ अंतर्गत मद्य अनुज्ञप्तीधारकांविरुध्द कारवाई करण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क यंत्रणा आहे. मद्य अनुज्ञप्तीधारकाच्या अनुज्ञप्तीबाबत तक्रार असल्यास किंवा अनुज्ञप्तीच्या अटी व शर्तीच्या भंगाबाबतची घटना निदर्शनास आल्यास पोलीस अधिकाऱ्यांनी त्यावर नियमानुसार कारवाई करण्यासाठी संबंधित राज्य उत्पादन शुल्क अधिका-यांना कळविणे अपेक्षित आहे. पोलीस अधिका-यांनी सदर अनुज्ञप्तीधारकांच्या अनुज्ञप्तीमधील अटी व शर्तीच्या भंगाबाबत कारवाई करणे अपेक्षित नाही. तथापि पोलीस अधिका-यांकडून मुंबई दारुबंदी कायदयाअंतर्गत अनुज्ञप्तीधारकांविरुध्द गुन्हे दाखल केल्याची प्रकरणे वेळोवेळी निदर्शनास आलेली आहेत. यास्तव गृह विभागाने दिनांक २० एप्रिल, १९८२ च्या परिपत्रकान्वये व दिनांक २७ ऑक्टोबर, १९८८ रोजीच्या पत्रान्वये तसेच पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, यांनी दिनांक ४ मे, १९७४ परिपत्रकान्वये सर्व पोलीस अधिकाऱ्यांना सूचना सुध्दा दिलेल्या आहेत. असे असले तरी पोलीस अधिका-यांकडून मुबई दारुबंदी कायदयाखाली अनुज्ञप्तीधारकांविरुध्द गुन्हे दाखल केल्याची प्रकरणे निदर्शनास येत आहेत. मा. उच्च न्यायालयाने याची दखल फौजदारी अर्ज क्र ६५२/११ आणि ६५६/११ प्रकरणी घेतली आहे. तसेच यापूर्वीच्या संतोष नायक वि. महाराष्ट्र शासन व इतर, फौजदारी अर्ज क्र ४१४/०३ मध्ये दि. ४ एप्रिल २००५ रोजी दिलेल्या निर्णयानुसार मद्य अनुज्ञप्तीच्या अटी व शर्तीच्या भंगाबाबत पोलीस अधिका-यांनी कारवाई करु नये, असे स्पष्ट केले आहे.

२. प्रसंगतः असे नमूद करण्यात येते की, मुंबई दारुबंदी कायदा, १९४९ अंतर्गत बहुतांश मद्य अनुज्ञप्तीसाठी जिल्हाधिकारी अनुज्ञप्ती प्राधिकारी आहेत. सदर कायदयाच्या कलम १०४ मध्ये अनुज्ञप्तीधारकाने केलेल्या नियमभंगाबाबत गांभीर्य विचारात घेऊन तडजोड शुल्क आकारण्याची तरतूद आहे. अनुज्ञप्तीधारकांवर किरकोळ नियमभंगासाठी गुन्हा दाखल केल्यास कायद्यातील तडजोड शुल्काची तरतूद निष्फळ ठरते. तसेच दोन शासकीय यंत्रणामध्ये योग्य समन्वयन नसल्याचे चित्र समोर उभे राहते. तसेच राज्य उत्पादन शुल्क विभाग हा शासनाचा महसूलाचा एक प्रमुख स्त्रोत असून विभागास रु.५९००/- कोटी वरुन रु.८५००/- कोटी इतका महसूल मिळविण्याचे उद्दिष्ट सन २०११-१२ या वर्षासाठी दिलेले आहे. पोलीस यंत्रणेकडून सर्वसाधारणपणे अवैध

तसेच मद्याची तस्करी इ. सारखे गुन्हे शोधून त्यांच्यावर कारवाई करणे अपेक्षित आहे. त्यामुळे अधिकृत मद्यविक्री वाढून शासनास अपेक्षित महसूल देखील मिळण्यास मदत होईल.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन आपण आपल्या अधिपत्याखालील सर्व संबंधित पोलीस अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना द्याव्यात.

आपला स्नेहांकित,

(रत्नाकर गायकवाड)

श्री.के.सुब्रहमण्यम,
पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-
सर्व पोलीस आयुक्त,
सर्व पोलीस अधिक्षक

आयुक्त,राज्य उत्पादन शुल्क,महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे कार्यालय.
जुने जकात घर,दुसरा मजला,फोर्ट,मुंबई-०१.

कार्यालय
उप. अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क-३,
अंधेरी (प), तहसिलदार कार्यालय

प्रति,

१) सर्व जिल्हाधिकारी.

२) सर्व विभागीय उप आयुक्त,
राज्य उत्पादन शुल्क.

३) सर्व अधीक्षक,
राज्य उत्पादन शुल्क.

दिनांक २५/१/१२
४९९

क्रमांकः- डिईटी ११२०१२/१८/९ मुंबई २१ जानेवारी २०१२.

विषयः-मुंबई दारुबंदी अधिनियम १९४९ अंतर्गत मद्य अनुज्ञप्तीधारकाविरुध्द पोलीस अधिकाऱ्यांनी गुन्हे दाखल न करण्याबाबत

विषयाधीन प्रकरणी मा. मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी त्यांचे अर्ध शासकीय पत्र क्रमांक एमआयएस-११११/प्र.क्र.३७२/राऊशु-३ दिनांक १३.१.२०१२ अन्वये दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने विशेष पोलीस महानिरीक्षक, (का.व.सु) पोलीस महासंचालक,मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक पोमसं/२३/५४/मद्य अनुज्ञप्ती/११७/२०१२ दिनांक १९.१.२०१२ ची प्रत माहिती ~~व योग्य त्या पुढील~~ कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.

मा.आयुक्तांच्या मान्यतेने.

O.S. / स्टेनो
त्या संदर्भात त्यापुर्वी
आदेश निर्गमीत झालेले आहे

2011
(प्रविण पवार)
संचालक (अंमलबजावणी व दक्षता)
आयुक्त,राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य मुंबईकरिता.

क्र. पांमसं/२३/५४/मद्य अनुज्ञप्ती/११७/२०१२ मुंबई, दिनांक १९/०१/२०१२

**विषय :- मुंबई दारुबंदी अधिनियम १९४९ अंतर्गत मद्य अनुज्ञप्तीधारकांविरुध्द पोलीस अधिका-यांनी गुन्हे दाखल न करण्याबाबत.**

*****

<u>परिपत्रक</u> :-

उपरोक्त विषयाबाबतचे मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांचे क्र. एमआयएस-११११/प्र.क्र. ३७२/राऊशु-३, दि. १३/०१/२०१२ चे अर्ध शासकीय पत्र सर्व पोलीस आयुक्त व पोलीस अधीक्षक यांना यापुर्वीच परस्पर पाठविले आहे. तथापि सदर अर्ध शासकीय पत्राची प्रत सुलभ संदर्भाकरीता सोबत जोडली आहे.

२. मुंबई दारुबंदी अधिनियम १९४९ अंतर्गत मद्य अनुज्ञप्तीधारकांविरुध्द कारवाई करण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क यंत्रणा कार्यरत आहे. शासन गृह विभागाने दि. २०/०४/१९८२ च्या परिपत्रकान्वये व दि. २७/१०/१९८८ च्या पत्रान्वये तसेच या कार्यालयाच्या दि. ४/०५/१९७४ च्या परिपत्रकान्वये मुंबई दारुबंदी कायद्याअंतर्गत पोलीस अधिका-यांनी अनुज्ञप्तीधारकांविरुध्द गुन्हे दाखल करु नयेत अशा सुचना सर्व पोलीस घटकांना दिलेल्या आहेत. तरीसुध्दा पोलीस अधिका-यांकडून मुंबई दारुबंदी कायद्याखाली अनुज्ञप्तीधारकांविरुध्द गुन्हे दाखल केल्याची प्रकरणे निदर्शनास येत आहेत. याबाबतची दखल मा. उच्च न्यायालयाने फौजदारी अर्ज क्र. ६५२/२०११ आणि ६५६/२०११ प्रकरणी घेतली आहे. तसेच यापुर्वीच्या संतोष नायर विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर, फौजदारी अर्ज क्र. ४१४/०३ मध्ये दि. ४/०४/२००५ रोजी दिलेल्या निर्णयानुसार मद्य अनुज्ञप्तीच्या अटी व शर्तीच्या भंगाबाबत पोलीस अधिका-यांनी कारवाई करु नये असे स्पष्ट केले आहे.

३. सदर प्रकरणी असे नमूद करण्यात येते की, मुंबई दारुबंदी कायदा १९४९ अंतर्गत मद्य अनुज्ञप्तीसाठी जिल्हाधिकारी अनुज्ञप्ती प्राधिकारी आहेत. सदर कायद्याच्या कलम १०४ मध्ये अनुज्ञप्तीधारकाने केलेल्या नियमभंगाबाबत गांभीर्य विचारात घेऊन तडजोड शुल्क आकारण्याची तरतूद आहे. अनुज्ञप्तीधारकांवर किरकोळ नियमभंगासाठी गुन्हा दाखल केल्यास कायद्यातील तडजोड शुल्काची तरतूद निष्फळ ठरते. तसेच दोन शासकीय यंत्रणांमध्ये योग्य समन्वय नसल्याचे चित्र समोर उभे राहते. तसेच राज्य उत्पादन शुल्क विभाग हा शासनाचा महसूलाचा एक प्रमुख स्त्रोत आहे. पोलीस यंत्रणेकडून सर्वसाधारणपणे अवैध तसेच मद्याची तस्करी इत्यादी सारखे गुन्हे शोधून त्यांच्यावर कारवाई करणे अपेक्षित आहे. त्यामुळे अधिकृत मद्यविक्री वाढून शासनास अपेक्षित महसूल देखील मिळण्यास मदत होईल.

E:\pen drive data\Sawant\Sawant Letter.doc

Director (Vigilance) DC(X)

This circular should be intimated to all Collectors and Supts.

20/1.

४. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांनी संदर्भाधीन दि. १३/०१/२०१२ च्या अ.शा. पत्रात दिलेल्या निर्देशानुसार, मुंबई दारुबंदी अधिनियम १९४९ अंतर्गत मद्य अनुज्ञप्तीधारकांच्या अनुज्ञप्तीबाबत तक्रार प्राप्त झाल्यास किंवा अनुज्ञप्तीच्या अटी व शर्तीच्या भंगाबाबतची घटना निदर्शनास आल्यास पोलीस अधिका-यांनी त्यावर नियमानुसार कारवाई करण्यासाठी संबंधित राज्य उत्पादन शुल्क अधिका-यांना कळवावे. पोलीस अधिका-यांनी सदर अनुज्ञप्तीधारकांच्या अनुज्ञप्तीमधील अटी व शर्तीच्या भंगाबाबतचे गुन्हे दाखल करु नयेत. जर अशा प्रकारचे गुन्हे दाखल झालेले आढळल्यास संबंधित कार्यक्षेत्रातील जबाबदार पोलीस अधिका-यावर शिस्तभंगाची कडक कारवाई करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. पोलीस अधिका-यांनी सर्वसाधारणपणे अवैध तसेच मद्याची तस्करी इत्यादी सारखे गुन्हे शोधून त्यांच्यावर कारवाई करावी. त्यामुळे अधिकृत मद्यविक्री वाढून शासनास अपेक्षित महसूल मिळण्यास मदत होईल.

१८/१/१२

**( गुलाबराव पोळ )**
विशेष पोलीस महानिरीक्षक (का.व सु.)
पोलीस महासंचालक यांचेकरीता.

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त (बृहन्मुंबई /लोहमार्गसह).
सर्व पोलीस अधीक्षक (जिल्हा व लोहमार्गसह).

प्रत,

अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., म.रा., पुणे.
अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग, म.रा., मुंबई.
सर्व परिक्षेत्रिय विशेष पोलीस महानिरीक्षक.

प्रत माहितीकरीता,

आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क विभाग, म.रा., मुंबई.

प्रत सस्नेह सादर,

मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.